महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित
एस्ट्रेला बॅटरीज एक्स्पॉन्शन कंपाऊंड इमारत, तळमजला, लेबर कॅम्प,धारावी रोड, माटुंगा,मुंबई-४०० ०१९

क्र.महानिर्मिती/मासं-सेप्र/ 10797 दिनांकः 28 OCT 2021

## अधिसूचना

**"उपविधी अधिकारी"(Dy. Law Officer) या पदाच्या ऑनलाईन परीक्षा दिनांक, ऑनलाईन परीक्षाकरीताचे प्रवेशपत्र व माहितीपत्रक**

**संदर्भ:- १) महानिर्मिती जाहिरात क्र.०३/२०२०**
**२) महानिर्मिती अधिसूचना क्र.८६२१ दि.३०.०८.२०२१**

महानिर्मिती कंपनीतर्फे जाहिरात क्र.०३/२०२० अन्वये "उपविधी अधिकारी" (Dy. Law Officer) यांची पदे सरळसेवा प्रवेशाव्दारे भरण्याकरीताची जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यास अनुसरुन अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यंत प्राप्त झालेल्या उमेदवारांची ऑनलाईन परीक्षा दि.१४.११.२०२१ रोजी पार पाडण्यात येणार आहे. उमेदवारांनी ऑनलाईन परीक्षेकरीताचे प्रवेशपत्र प्राप्त करुन घेण्यासाठी खालील ठिकाणी क्लिक करावे.

**ऑनलाईन परीक्षेकरीताचे प्रवेशपत्र** ↵

तसेच उमेदवारांनी ऑनलाईन परीक्षेबाबतचे माहितीपत्रक प्राप्त करुन घेण्यासाठी खालील ठिकाणी क्लिक करावे.

**ऑनलाईन परीक्षेबाबतचे माहितीपत्रक** ↵

१) महानिर्मिती अधिसूचना क्र.८६२१ दि.३०.०८.२०२१ अन्वये "उपविधी अधिकारी" (Dy. Law Officer) या पदाकरीता सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातून (S.E.B.C)जाहिरातीच्या अंतिम दिनांकापूर्वी अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (E.W.S) अथवा अराखीव (खुला) प्रवर्गातून विकल्प विनंती अर्ज सादर करण्याबाबत कळविले होते. त्यानुसार प्राप्त झालेले विकल्प विनंती अर्जानुसार वरील उमेदवारांना संबंधित प्रवर्गात स्थालांतरीत करण्यात आले आहे. तसेच सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील (S.E.B.C) ज्या उमेदवारांनी विकल्प विनंती अर्ज सादर केला नाही अशा उमेदवारांना अराखीव (खुला) प्रवर्गातंर्गत स्थलांतरीत करण्यात आले आहे. यापुढील या पदांच्या भरती प्रक्रिये दरम्यान सदरील उमेदवारांचा त्या त्या प्रवर्गात स्थलांतरीत आलेल्या प्रवर्गांचा विचार करण्यात येईल.

२) वरील ऑनलाईन परीक्षा ही उमेदवारांनी सादर केलेले कोणतेही कागदपत्रे म्हणजेच शैक्षणिक अर्हता, वयाचा पुरावा, अनुभव प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र इत्यादी यांची पडताळणी न करता उमेदवारांनी केवळ अर्जात सादर केलेल्या माहितीच्या आधारे त्यांना ऑनलाईन परीक्षेकरीता बोलविण्यात आले आहे. अर्जात नमूद केलेली कागदपत्रे /प्रमाणपत्रे भविष्यात जमा करण्याच्या प्रक्रिये दरम्यान सादर करणे तसेच सिध्द करण्याची जबाबदारी संपूर्णत: उमेदवाराची राहील. तसेच अर्जात नमूद माहिती उमेदवार सिध्द न करु शकल्यास अथवा खोटी आढळल्यास भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यात उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्यात येईल, याची उमेदवारानी नोंद घ्यावी.

२/-

३) वरील ऑनलाईन परीक्षेत उमेदवाराच्या नावाचा समावेश आहे म्हणून नेमणूक देण्याबाबतचा कोणताही हक्क उमेदवारांना राहणार नाही.

४) ऑनलाईन परीक्षेअंती जाहिरातीत नमूद सामाजिक व संमातर आरक्षणासह इतर अटींच्या अधिन राहून गुणानुक्रमे वैयक्तिक मुलाखत परीक्षेस पात्र ठरत असलेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्यात येईल. सदरील यादीत नमूद उमेदवारांची कागदपत्रे जमा करणे प्रक्रिया व वैयक्तिक मुलाखत प्रक्रिया पार पाडण्यात येईल. अंतिम निवड यादी प्रसिध्द करण्यापूर्वी उमेदवारांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करुन कागदपत्रे पडताळणीअंती पात्र/अपात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्यात येईल. सदरील यादीतील पात्र उमेदवारांपैकी ऑनलाईन परीक्षा व वैयक्तिक मुलाखत परीक्षा यांचे एकत्रित गुण विचारात घेऊन जाहिरातीत प्रसारित सामाजिक व समांतर आरक्षणसह ईतर अटींनुसार अंतिम निवड यादी प्रसिध्द करण्यात येईल.

५) महानिर्मिती प्रशासकीय परिपत्रक क्र.४०० दि.२३.०१.२०१८ नुसार सरळसेवा प्रवेशाव्दारे प्रसिध्द करण्यात येणाऱ्या पदांकरीता मागास प्रवर्गातून (Backward Class) अंतिम निवडी करीता एकूण गुणांपैकी किमान ३०% गुण व खुल्या प्रवर्गातून (Open Category) अंतिम निवडीकरीता एकूण गुणांपैकी किमान ४०% गुण मिळविणे आवश्यक आहे, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

६) ऑनलाईन परीक्षेतील गुणांच्या आधारे केवळ वैयक्तिक मुलाखत परीक्षेच्या यादीत उमेवारांच्या नावाचा समावेश आहे म्हणून नेमणूक देण्याबाबतचा कोणताही हक्क उमेदवारांना राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

**कार्यकारी संचालक (मासं)**
**महानिर्मिती**